ePaper

## ब्रिजभूषण सिंह यांचे पंख छाटण्याची भाजपकडून तयारी




| वर्ष - 7 | अंक -37 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 3 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- पुणे जिल्ह्यात 'शासन आपल्या दारी'अभियान!
- महापालिकेच्या शाळांमध्ये भरणार २०९ जागा, शिक्षक भरतीसाठी गर्दी!


# पिंपरी-चिंचवड शहरात राहण्यासाठी नागरिकांची वाढती पसंती!

## कर संकलन विभागाकडे नोंद झालेल्या मालमत्तांची संख्या सहा लाखांच्या वर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**वीज, पाणी या मूलभूत सुविधांसह सुसज्ज रस्ते, उड्डाणपूल, आयटी पार्क, नामांकित शैक्षणिक संस्था, वैद्यकीय उपचारांची दर्जेदार सुविधा यामुळे पिंपरी-चिंचवड शहर नागरिकांच्या दृष्टीने आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. याचाच परिणाम म्हणून गेल्या पाच वर्षांत शहरातील मालमत्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून 31 मे 2023 अखेर 6 लाख 2 हजार 203 नोंदणीकृत मालमत्ता झाल्या आहेत. तर गेल्या वर्षभरात शहरात 25 हजार 637 मालमत्तांची भर पडली आहे.**




| वर्ष. | मालमत्ता संख्या | वाढ |
|---|---|---|
| 2019-20 | 527338 | |
| 2020-21 | 542724 | 15386 |
| 2021-22 | 571592 | 28868 |
| 2022-23 | 597229 | 25637 |
| 2023-24 | 602203 | 4974 |

(31 मे 2023 अखेर)

**एकूण मालमत्ता संख्या आणि मालमत्ता वाढीचा दर**




पिंपरी-चिंचवडनगरीची लोकसंख्या सुमारे 30 लाखांवर पोहोचली आहे. केंद्र सरकारच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नेहरू अभियानांतर्गत (जेएनएनयुआरएम) शहरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. सुसज्ज आणि प्रशस्त रस्ते, उड्डाणपूल शहराची ओळख बनली आहे. शहरात पायाभूत सुविधा उच्च दर्जाच्या आहेत. शहराच्या विविध भागात झालेली उद्याने, क्रिडांगणे, जलतरण तलाव, चौकाचे सुशोभीकरण यासह महापालिकेने उभारलेल्या वैविध्यपूर्ण प्रकल्पांमुळे हा परिसर नागरिकांच्या दृष्टीने आकर्षणाचा केंद्रबिंदू झाला आहे. त्यामुळे दरवर्षाला शेकडो मालमत्तांची भर पडत आहे. सन 2017 मध्ये शहरात 4 लाख 50 हजार 761 मालमत्ता होत्या. सध्या 6 लाख 2 हजार 203 मालमत्ता आलेख लक्षात येत आहे.

पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरालगतच हिंजवडी आयटी पार्क, तळवडे आयटी पार्क, चाकण, रांजणगाव एमआयडीसी हा भाग येतो. या भागात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कामासाठी भागात कामगार वर्ग रोजगारानिमित्त वास्तव्यास आहे. मात्र, या भागात अंतर्गत रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत. त्यामुळे येथील कामगार वर्ग पिंपरी-चिंचवड शहरात वास्तव्यास प्राधान्य देतो.

### मिळकती वाढत असल्याने उत्पन्नामध्येही गरुडझेप

शहरात औद्योगिक मिळकतीसह निवासी मिळकतींच्या संख्येमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळेच महापालिकेच्या उत्पन्नातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. गतवर्षी कर संकलन विभागाचे पालिकेच्या इतिहासात 817 कोटी रुपयांचा कर वसूल केला. 2023-24 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटी रुपयांचा कर वसूलीचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी टार्गेट ठेवले आहे.

### या भागात वाढताहेत मालमत्ता..

शहराच्या चारही बाजूंनी मोठ-मोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. शहरात 17 मालमत्ता कराची विभागीय कार्यालये आहेत. यामध्ये प्रामुख्याने वाकड, चिखली, मोशी, किवळे, चऱ्होली, थेरगाव, सांगवी, भोसरी, दिघी-बोपखेल या कार्यालय परिसरात मालमत्ता वाढीचा वेग जास्त आहे.

“ पुण्यापेक्षा पिंपरी-चिंचवड शहराचा मालमत्ता वाढीचा दर अधिक आहे. शहरातील प्रशस्त रुंद रस्ते, उद्याने, क्रीडांगणे, इतर मूलभूत सोयी सुविधा यामुळे नागरिक पिंपरी-चिंचवडला पसंती देत आहेत. मात्र वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा करणे आणि शहराचा शाश्वत विकास ही दोन आव्हाने सध्या पालिकेसमोर आहेत. त्यांनाच प्राधान्य देऊन काम केले जाईल. कुठल्या पॉकेटमध्ये काय गरजा आहेत हे निश्चित करणे सोपे जाईल. त्यातून नियोजनबद्ध विकास शक्य होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या सर्वंकष सर्वेक्षणाला सहकार्य करावे.

– **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

“ विभागाच्या सर्व सेवा ऑनलाईन केल्या आहेत. त्यामुळे विभागाचे मनुष्यबळ हे अधिकाधिक कर आकारणीकडे वळवता येणे शक्य झाले आहे. मात्र आजही किमान पन्नास हजार मालमत्ता या कराच्या कक्षेत नसाव्यात असा अंदाज आहे. नवीन सर्वंकष सर्वेक्षणाच्या माध्यमातून वाढीव, नवीन मालमत्ता कराच्या कक्षेत आणल्या जातील. शहराचे निव्वळ तीन झोनमध्ये वर्गीकरण केले गेले आहे, ते बदलून शहरात मायक्रो झोनिंग करण्यात येणार आहे. त्यामुळे समन्यायी आणि पारदर्शी कर प्रणाली लागू करता येईल. याचा फक्त कर संकलन विभागच नव्हे तर पालिकेच्या अन्य विभागांना कामांचे नियोजन करण्यात मदत होईल.

– **नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# मिळकतकराबाबत पुणेकरांना मिळणार दिलासा

# 'पीटी 3' अर्ज भरल्यास थकबाकी माफ!

## निर्णय होऊनही बिलात थकबाकी, मिळकतधारक त्रस्त

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मिळकतकरातील चाळीस टक्के सवलत कायम ठेवण्याच्या निर्णय झाल्यानंतरही बिलात थकबाकी दाखविण्यात आली असल्याने काही मिळकतधारक त्रस्त झाले आहेत. महापालिकेने बिलात २०१९ पासूनची थकबाकी दर्शविल्याने हे नागरिक चिंतेत पडले आहेत. दरम्यान, सध्या फक्त चालू आर्थिक वर्षाचा मिळकतकरच भरायचा असून, 'पीटी ३' अर्ज भरून दिल्यास ही थकबाकी माफ होईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

महापालिकेतर्फे पुणेकरांना त्यांच्या निवासी मिळकतीसाठी १९७०पासून मिळकतकरातील सर्वसाधारण करात ४० टक्के सवलत दिली जात होती. मात्र, त्यावर महालेखापालांनी आक्षेप घेतल्यानंतर २०१८पासून ही सवलत रद्द करण्यात आली. त्यानुसार महापालिकेने २०१९पासून नवीन कर आकारणी केलेल्या मिळकतींची ४० टक्के सवलत काढून घेतली. 'जीआयएस मॅपिंग सर्व्हे'मध्ये भाडेतत्त्वावर देण्यात आल्याचे आढळलेल्या मिळकतींचीही सवलत काढून घेतली. अशा साधारण एक लाख ६५ हजार मिळकतधारकांसाठी ही सवलत रद्द करण्यात आली. यावर मोठा जनक्षोभ उसळल्यानंतर राज्य सरकारने ही सवलत पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला.






शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिकांना 'पीटी ३' अर्ज भरून सादर करायचा आहे. मात्र, प्रकृती किंवा अन्य कारणामुळे त्यांना घराबाहेर पडून खेटे घालून ही प्रक्रिया पूर्ण करणे शक्य नाही. अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी महापालिकेने अधिकृत कर्मचाऱ्यांमार्फत घरपोच सुविधा उपलब्ध करावी, अशी मागणी केली जात आहे.

> ज्या नागरिकांना २०१९पासून १०० टक्के मिळकतकर लागू झाला, त्यांच्या यंदाच्या बिलांमध्ये २०१९पासून ४० टक्के सवलतीची थकबाकीही दर्शविण्यात आली आहे. या बिलात चालू मागणी (२०२३-२४ साठीचा दोन्ही सहामाहींचा कर) व थकबाकी असे दोन्ही पर्याय दर्शविण्यात आले आहेत. त्यानुसार या मिळकतधारकांनी केवळ चालू मागणीचे बिल भरावे. त्याचबरोबर त्यांनी योग्य पुराव्यांसह 'पीटी ३' अर्जही भरून द्यायचा आहे. हा अर्ज मान्य झाल्यास त्यांच्या बिलातील थकबाकी माफ केली जाईल. त्यामुळे त्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. अर्ज अमान्य झाल्यास त्यांना ही थकबाकी भरावी लागेल. -
>
> - **अजित देशमुख,** उपायुक्त, कर आकारणी व कर संकलन

### आता काय होणार

» २०१९पासून ४० टक्के सवलत रद्द झालेल्या मिळकतधारकांनी 'पीटी ३' फॉर्म भरून द्यायचा आहे. हे अर्ज महापालिका भवन येथील मुख्य कार्यालयात, क्षेत्रीय कार्यालयांमध्ये; तसेच ऑनलाइन पद्धतीनेही उपलब्ध आहेत. अर्ज भरून सर्व पुराव्यांसह क्षेत्रीय कार्यालये अथवा महापालिका भवनातील मिळकतकर विभागात १५ नोव्हेंबरपर्यंत जमा करायचे आहेत. १५ नोव्हेंबरनंतर येणाऱ्या अर्जांचा सवलतीसाठी विचार होणार नाही. अर्ज मिळाल्यानंतर मिळकतींची व कागदपत्रांची कर निरीक्षकांच्या मार्फत तपासणी करण्यात येईल. खोटी माहिती दिल्यास कुठलीही करसवलत लागू होणार नाही. 'पीटी ३'अर्ज मंजूर झाल्यास त्यापूर्वी थकबाकीपोटी भरलेली रक्कम पुढील चार वर्षांच्या मिळकतकरातून समान हप्त्यांद्वारे समायोजित केली जाईल.

### अर्जासोबत आवश्यक बाबी

- » मिळकतीचा वापर स्वतःच्या राहण्यासाठी करीत असल्यास सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र.
- » मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, रेशनकार्ड, वाहनचालक परवाना, गॅस कार्ड यांपैकी एक ओळखपत्र.
- » शहरात अन्यत्र मिळकत असल्यास त्याच्या मिळकतकर बिलाची प्रत.
- » २५ रुपये प्रक्रिया शुल्क

### महत्त्वाच्या गोष्टी

- » सवलत फक्त मिळकतधारकाच्या निवासी मिळकतीसाठीच.
- » भाडेकरू असल्यास सवलत लागू होणार नाही.
- » पूर्वीपासून ४० टक्के सवलत मिळणाऱ्यांनी 'पीटी ३' फॉर्म भरू नये.
- » २०१८-१९ पासून नव्याने नोंदणी झालेल्या मिळकतींसाठी अर्ज भरणे आवश्यक.

---

# दहावीतील गुणफुगवटा ओसरला; गुणवंतांमध्ये घट!

## चार वर्षांतील नीचांकी निकाल : राज्याचा निकाल 93.83 टक्के, 95.64% पुणे विभाग

।पुणे ।महाईन्यूज

**अंतर्गत मूल्यमापनामुळे जवळपास सर्वच विद्यार्थी गेल्या वर्षी उत्तीर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर यंदा पारंपरिक पद्धतीने झालेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल राज्य मंडळाने शुक्रवारी जाहीर केला. यंदा राज्याचा निकाल ९३.८३ टक्के लागला असून, गेल्या चार वर्षांतील हा नीचांक आहे. त्याचबरोबर ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही घटली आहे.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (राज्यमंडळ) दहावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ९३.८३ टक्के विद्यार्थी यंदा उत्तीर्ण झाले आहेत.

गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा निकालात घट झाली असून गेल्यावर्षी ९६. टक्के निकाल जाहीर झाला होता. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होण्याबरोबरच गुणवंत विद्यार्थ्यांच्या संख्येतही घट झाली आहे. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही गेल्यावर्षीच्या तुलनेत १ लाख ६२ हजारांनी घटली आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्यावर्षी परीक्षा न होता विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करून निकाल जाहीर करण्यात आला होता.१५१ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी राज्यातील १५१ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवले असून, त्यातील १०८ विद्यार्थी लातूर विभागातील आहेत.



### विभागनिहाय निकाल

- » ९८.११% कोकण विभाग
- » ९५.६४% पुणे
- » ९२.०५% नागपूर
- » ९३.२३% औरंगाबाद
- » ९३.५५% मुंबई
- » ९६.७३% कोल्हापूर
- » ९३.२२% अमरावती
- » ९२.२२% नाशिक
- » ९२.७६% लातूर

# "शासन आपल्या दारी" च्या यशस्वीतेसाठी सकारात्मक योगदान द्या!

## भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचे आवाहन

### भोसरीत शासकीय अधिकारी आणि स्वयंसेवकांची आढावा बैठक

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शासकीय कार्यालयांमध्ये आलेल्या नागरिकांना मोकळ्या हाताने परत जावे लागू नये. यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला पाहिजे. महसूल विभागाशी संबंधित सर्व कार्यालयांनी दक्षता घेतली पाहिजे. 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचा उद्देश सरकारी सेवा आणि लाभ घेताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करणे हा आहे. त्यामुळे शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सकारात्मक भूमिकेतून कामकाज केले पाहिजे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केले.**



भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत "शासन आपल्या दारी" हा उपक्रम आयोजित केला आहे. दि. १ जून ते १२ जून २०२३ पर्यंत मतदार संघातील विविध ८० ठिकाणी विविध योजनांचे अर्ज संकलन करण्यात येणार आहे. तसेच, दि. १५ जून २०२३ रोजी एकत्रितपणे लाभार्थींना दाखल्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरूवात झाली असून, विविध शासकीय विभागाचे अधिकारी आणि स्वयंसेवक, पदाधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी आमदार लांडगे बोलत होते. यावेळी पिंपरी-चिंचवडच्या तहसीलदार डॉ. अर्चना निकम, अन्न धान्य वितरण विभागाचे नायब तहसीलदार नागनाथ भोसले, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार अर्चना देशपांडे, संजय गांधी निराधार योजना नायब तहसीलदार निलीमा थेऊरकर, अ-परिमंडळ विभागाचे सचिन काळे, माजी स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, नितीन लांडगे, माजी नगरसेवक दत्तात्रय गायकवाड आदी उपस्थित होते.

अनेकदा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. नागरिकांना यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे 'शासन आपल्या दारी' या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातील किमान ७५ हजार लाभार्थ्यांना एका छताखाली लाभ देण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ कमीत-कमी कागदपत्रे आणि जलद मंजुरी अशा सूत्राने देण्यात येत आहे, अशी माहिती अभियानाचे समन्वयक अनिकेत गायकवाड यांनी दिली.

#### तलाठी कार्यालयाला खडे बोल सुनावले...

महसूल विभागाशी संबंधित तलाठी कार्यालयात नागरिक दाखल्यासाठी येतात त्यांना मोकळ्या हाताने परत जावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी. माझ्या कार्यालयातून प्रत्येक महिन्याच्या १५ व ३० तारखेला या ८० केंद्रामधून जमा होणारे अर्ज आणि देण्यात येणारे दाखले याबाबत आढावा घेतला जाईल. 'शासन आपल्या दारी योजना' च्या माध्यमातून मिळणारे लाभ, योजना काय-काय असतील, सर्व योजना या विषयी संपूर्ण माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका ठेवावी, अशा सूचना आमदार लांडगे यांनी दिल्या.

# पिंपरीत बालविवाह प्रकरणी वर तरुणाला अटक!

## पिंपरीगाव येथील वाघेरे कॉलनीतील गीता निवासमध्ये राहणाऱ्या 16 जणांवर गुन्हा दाखल

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवडमध्ये बालविवाह केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पिंपरीगाव येथील वाघेरे कॉलनीतील गीता निवासमध्ये राहणाऱ्या वर तरुणाला अटक करण्यात आली आहे. तर पिंपरी पोलीस ठाण्यात तब्बल १६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ०२ जानेवारी २०२३ ते १७ मे २०२३ च्या दरम्यान घडला आहे.**

रोहित सुरज भोसले (वय २२, रा. गीता निवास, सौंदर्य चौक, वाघेरे कॉलनी, पिंपरीगाव, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या वर तरुणाचे नाव आहे. तर वर तरुणाचा मावस भाऊ रोहन राजेंद्र कांबळे (वय २२), मामे आजोबा लालासो कांबळे (वय ७०), मुलाचा मित्र तुषार गायकवाड (वय २२, रा. खडकी, पुणे), वर मुलाचा भाऊ प्रेम ऊर्फ राहुल सुरज भोसले (वय १७), मावशीचा नवरा शिवाजी साळवे (वय ४५) तसेच मुलाच्या मावशीची तीन मुले आणि ६ महिला अशा एकूण १६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, वर मुलाला मुलगी अल्पवयीन आहे, हे माहिती होते. मात्र, तरी देखील मुलाने अल्पवयीन मुलीशी लग्न केले.

त्यानंतर पीडित मुलीसोबत जबरदस्ती अनेकवेळा शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मुलीने नकार दिल्यास तिला मारहाण करण्यात आली. तसेच घरच्या मंडळींकडून सातत्याने छळ केला जात होता. अखेर या प्रकरणी एका महिलेने पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यानुसार, वर मुलाला अटक करून १६ जणांवर कलम ३७६ (३), ३५४, ३५४(अ), ३२३, ५०४, लैंगिक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४, ८, १७, तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियम कलम ९, १०, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पिंपरी पोलीस करत आहेत.

#### बालविवाह रोखण्यासाठी पुढे यावे

**बालविवाह रोखण्यासाठी यंत्रणेतील सर्व घटकांनी एकत्र येऊन काम करावे. अंगणवाडी सेविकांनी किशोरवयीन मुलींचे मेळावे घ्यावे व महिला बचत गटांच्या मासिक सभा, ग्रामसभा यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी प्रबोधन करून लोकसहभागातून बालविवाह थांबविण्यासह वधू-वर पालकांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी काम करावे, असे आवाहन प्रशासनाकडून वेळोवेळी करण्यात येते.**

# शब्द आणि ग्रंथप्रामाण्य आणखी किती दिवस ?




दूरसंचार आणि इंटरनेटमुळे जग जोडले गेले नसते तर आजही आपण जगातल्या प्रगत माहिती तंत्रज्ञान ,संशोधने आणि माहितीपासून अलिप्त राहिलो असतो. साठ ,सत्तर वर्षांपूर्वीचा काळ आठवला की लक्षात येते शेजारच्या जिल्ह्यात झालेल्या घडामोडी सुद्धा काहीमहीन्यानी कानावर येत होत्या. दळणवळणाची प्रगत साधने नव्हती आणि पंचक्रोशीच्या बाहेर जायला लोक धजावत नव्हते. सोयरीक सुद्धा दोन कोसाच्या परिघात कशा होतील यावर सगळ्यांचा भर असायचा. साधे जिल्ह्याच्या ठिकाणी जायचे म्हटले तर दमनी ,बैलगाडीने मजल दर मजल करत जावे लागत होते. रेल्वेचे जाळे टाकणे नुकतेच सुरु होते ,जिथे रेल्वे सुरु झाली तिथे त्यात बसायला सामान्य व्यक्ती धजावत नव्हता. वाफेवर चालणारी अजस्त्र इंजिने शेकडो माणसांना घेऊन जातात हे प्रथमच बघितले जात होते म्हणून रेल्वे अनेकांना सैतानाची करामत वाटत होती. प्रारंभी त्यात फुकटातही बसायला लोक तयार नव्हते.

आता अख्खे जग आपल्या कवेत आले आहे. नेटच्या महाजालाने सगळे कसे लाईव्ह करून टाकले आहे. आता लोक लाईव्ह करीत आत्महत्या सुद्धा करायला लागले आहेत. जगाच्या कोणत्याही सुदूर कोपऱ्यात असलेल्या मित्राशी थेट प्रक्षेपण करीत गप्पा मारण्याचे आता कुणाला नवल वाटत नाही. हजारो मैल दूर असलेल्या मुलांशी आईबाप अलीकडे दररोज व्हिडीओ गप्पा मारताना दिसतात. याच क्रांतीतून जगाच्या कुठल्यातरी देशात कोणते प्रयोग होत आहेत याची सविस्तर माहिती प्रत्येकापर्यंत पोहचत आहे. आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही असे भन्नाट प्रयोग माहिती तंत्रज्ञानात दररोज केले जात आहेत. लाखो मेंदू माणसाचे जीवन अधिक सुखकर व्हावे यासाठी



राबत आहेत. त्याच्या जोडीला कृत्रिम बुद्धिमत्ता आली आहे. त्याद्वारे अशक्य अश्या गोष्टी शक्य होताना दिसत आहेत. आपण मात्र अजूनही शब्द आणि ग्रंथप्रामाण्य यांच्या कचाट्यातून सुटू शकलो नाही.

आजच्या काळातही धार्मिक पुस्तके थेट देव अल्लाह आणि गॉड याने लिहून पाठवली आहेत त्यामुळे त्यातील प्रत्येक शब्द खरा असल्याचे मानले जात आहे. एका बाजूला हिंदू असे मानतात की जन्मतः बजरंगबली सूर्याला गिळायला निघाले होते तर दुसऱ्या बाजूला प्रेषित कुण्यातरी प्राण्यावर बसून अवकाश यात्रा करतात असे आजही मानले जाते,लोकांना त्याची चिकित्सा करावीशी वाटत नाही,त्याबद्दल डोक्यात कोणतेही प्रश्न निर्माण होत नाहीत. अशीच असंख्य वर्णने विविध धर्माच्या ग्रंथात वाचायला मिळतात. चमत्कार म्हणून विविध धर्माचे अनुयायी त्यावर आजही भरवसा ठेवतात. ग्रंथात लिहिलेला शब्द आणि गुरूने उच्चारलेला प्रत्येक शब्द खरा असतो असे मानणाऱ्या कोट्यवधी लोकांमध्ये शिक्षित लोकांची संख्या अधिक असते हे आजच्या काळात अधिक चिंताजनक आहे. व्यक्तीच्या जन्मापासून तर मृत्यू पर्यंत सगळे काही लिहून ठेवलेले असते ,सगळे त्याच प्रमाणे घडत असते असे मानणारे लोकही चक्क दवाखान्यात जाऊन स्वतःवर उपचार करीत असतात.

जे अनुयायी भारतालाच आपले जग मानतात त्यांच्यासाठी जगात सगळे काही देवाने,धर्माने किंवा गुरूने जसे सांगून ठेवले आहे तसेच घडत असते. जन्मापासून मरेपर्यंत सगळे काही ठरलेले आहे असे ज्यांना वाटते तेच लोक प्रचंड धनाच्या हव्यासापोटी अनैतिक तडजोडी करताना दिसत असतात. देवाच्या,अल्लाहच्या किंवा गॉडच्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हलू शकत नाही यावर श्रद्धा ठेवणारे कोट्यवधी धार्मिक लोक प्रत्यक्ष जीवनात मात्र रस्त्यावर कुणाचा धक्का जरी लागला तरी हाणामारीचे एपिसोड घडवत असतात. लग्नगाठी स्वर्गात बांधल्या जातात हे ज्यांना मान्य असते तेच श्रद्धावान लोक लग्नाच्या काही महिन्यातच स्वर्गातल्या गाठी हुंड्यासाठी तोडण्यास तयार असतात असे करताना ज्याने गाठी बांधून दिल्या त्या स्वर्गातल्या देवाला काय वाटेल याची त्यांना अजिबात फिकीर नसते. जळी,स्थळी,काष्ठी,पाषाणी देव आहे असे मानणारे लोक कुणाची नजर आपल्यावर नाही हे लक्षात येताच चक्क चोरी करण्यास तयार होतात.

कणाकणात देव असण्याची शिकवण भाविकांना देणारे पुजारी चक्क मंदिरात मुलींवर बलात्कार करतात,भगवान सब देखता है असे सांगणारे मंदिर,मशीद आणि चर्चचे विश्वस्त देणग्यांचा घोटाळा करतात, आईच्या पायाखाली स्वर्ग असल्याची बतावणी करणारे दिवटे चिरंजीव तिला वृद्धाश्रमात टाकून देतात तेव्हा हेच देव कुठे पर्यटनाला जातात असा प्रश्न कुणाला अलीकडे पडत नाही कदाचित हा उच्च शिक्षणाचा परिणाम असावा. शिकलेली माणसे स्वतःचा विवेक काय सांगतो यापेक्षा धर्मग्रंथ किंवा गुरु काय सांगतात यावर अधिक भर देताना दिसतात आणि त्यावर स्वतःच्या जीवनातील प्रश्नांची उत्तरे शोधताना दिसतात हे तर फारच गंभीर झाले आहे. मंदिरात देव नाही तर पुजाऱ्याचे पोट राहते असे ज्या अडाणी गाडगेबाबांनी सांगितले त्याच मंदिरात भरमसाठ शिक्षण घेणाऱ्यांनी गेल्या काही वर्षात प्रचंड गर्दी करायला सुरुवात केली आहे. हे कितीकाळ चालेल याला उत्तर मिळत नाही.

## संपादकीय »

### शेवटची तिमाही गोड

***'नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील आर्थिक विकासाचे आकडे प्रकाशित झाले असून ते जागतिक वित्तसंस्थांना तसेच भारतामधील काही तज्ज्ञांनाही बुचकळ्यात टाकणारे ठरले आहेत.***

ही शेवटची तिमाही म्हणजे जानेवारी ते मार्च २०२३. या तिमाहीने जीडीपी म्हणजे देशांतर्गत सकल उत्पादनाचा दर ६.१ टक्के असा भक्कम नोंदवला आहे. मात्र, या संपलेल्या आर्थिक वर्षाबाबत निराशेचे वातावरण निर्माण झाले होते, ते त्याच्या आधीच्या तिमाहीमुळे. त्या तिमाहीत म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ या कालावधीत जीडीपीने केवळ ४.५ टक्के अशी नीचांकी कामगिरी नोंदवली होती. शेवटच्या तिमाहीत ती तशीच राहिली असती तर या आर्थिक वर्षाचे लक्ष्य तर साधले नसतेच पण एकूण शेअर बाजार, चलन बाजार, देशात येणारी गुंतवणूक आणि करोनानंतरची आर्थिक उमेद.. या साऱ्यांनाच जबरदस्त धक्के बसले असते. अशा कामगिरीचे अर्थातच राजकीय पडसादही उमटले असते. मात्र, शेवटच्या तिमाहीतील कामगिरीमुळे केंद्र सरकारनेही सुटकेचा नि:श्वास टाकला असेल.

**'पीएलओएस वन' या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या या संशोधनानुसार, नियमित व्यायाम करणाऱ्या व्यक्तींची वेदना सहन करण्याची शक्ती ही क्वचितच व्यायाम करणाऱ्या लोकांपेक्षा... नियमित व्यायाम केल्यामुळे स्नायू बळकट होतात, आजारांचा धोका कमी होतो आणि मानसिक आरोग्य सुधारते, हे लाभ सर्वज्ञात आहेत. मात्र, व्यायामाच्या आणखी एका, अनपेक्षित अशा लाभाकडे युरोपातील एका संशोधनाने लक्ष वेधले आहे- तो म्हणजे व्यायामामुळे वेदना सहन करण्याची शक्ती वाढते.**

## व्यायामाने वेदनाशमन

नॉर्वेमधील ट्रॉम्स शहरात आरोग्य आणि आजार या विषयावर झालेल्या व्यापक सर्वेक्षणातून हे निष्कर्ष समोर आले आहेत. यासाठी, ३० ते ८७ वर्षे वयोगटातील १० हजार ७३२ व्यक्तींचा अभ्यास करून निरीक्षणे नोंदवण्यात आली. शारीरिक हालचालींमुळे वेदनाशमनाचे कार्य नेमके कसे होते, याबाबत उत्सुकता आहे. मात्र, शास्त्रज्ञांच्या मते, व्यायामामुळे होणारे शारीरिक बदल जसे की, अल्पसंवेद्यता (वेदना आणि संवेदना यांची जाणीव कमी होणे) हे याचे संभाव्य कारण असू शकते. 'रनर्स हाय' म्हणून ओळखली जाणारी स्थिती हे याचेच उदाहरण. यात व्यायामानंतर शरीरात स्वत:चे वेदना कमी करणारे घटक स्रवतात, हे एखाद्या वेदनाशामक औषधाप्रमाणेच वेदनाग्राही केंद्रांची संवेदना कमी करतात. त्याशिवाय, व्यायामामुळे शरीरातील अंतर्जात कॅनेबायनॉइड्सचे प्रमाण वाढून सहनशक्ती वाढते.

अर्थात, वेदना ही केवळ शारीरिक स्थिती नाही, तर तो अनुभव आहे. त्यामुळे, मानसिकता हाही यात महत्त्वाचा घटक ठरतो. व्यायामामुळेही काही प्रमाणात वेदनांचा अनुभव येतो. त्यामुळे आपला वेदनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. व्यायाम करताना वेदनांना सामोरे गेल्याने तणावाच्या परिस्थितीत कार्य करण्याची



क्षमता म्हणजेच लवचिकता विकसित होते. शिवाय, वेदना जाणवत असतानाही काही कृती करता येते, हा आत्मविश्वास वाढतो. व्यायामामुळे आपली मनस्थिती सुधारते, परिणामी वेदनांना सामोरे जाण्यास आपण अधिक सबळ होतो. व्यायामांमुळे वेदनांवरून लक्ष विचलित करणे शिकता येते. अर्थात, याबाबत अधिक संशोधन आवश्यक असले, तरी व्यायामाचे महत्त्व यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची सीसीटीव्ही कॅमेरे फेज-2

# निविदा प्रक्रिया रद्द करा!

## » आमदार अण्णा बनसोडे यांची आयुक्तांकडे मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून अत्यंत महत्त्वपूर्ण असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. याबाबत आपल्या भूमिकेचे स्वागत आहे. मात्र, कॅमेरे बसवण्याच्या कामात पारदर्शीपणा नाही, असा संशय निर्माण झाला आहे, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करावी आणि नव्याने पारदर्शीपणे राबवावी, अशी मागणी आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरात सुमारे ३ हजार सीसीटीव्ही कॅमेरे तैनात करण्यात येणार आहेत. सुरूवातीला स्मार्ट सिटी योजनेतून पहिल्या टप्प्यातील कॅमेरे तैनात केले. त्यानंतर फेज- १ आणि फेज- २ असे तिसऱ्यांदा कॅमेरे बसवण्याचे काम काढले आहे. सुरवातीच्या दोन टप्प्यांत बसवलेले ७० टक्के कॅमेरे बंद अवस्थेत आहेत. ते पूर्ण क्षमतेने सुरू करण्यापूर्वीच प्रशासनाने तिसऱ्यांदा सुमारे १७० कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबवली आहे.

विशेष म्हणजे, निविदा प्रक्रिया राबवित असताना संबंधित सल्लागार कंपनी आणि प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे मिलीभगत करुन विशिष्ठ ठेकेदाराला व ठराविक कंपन्यांचे साहित्यच खरेदी करणे भाग पडेल अशा हेतुने नियमावली तयार केली आहे. परिणामी, निविदा प्रक्रियेमध्ये सशक्त स्पर्धा होत नाही. ठेकेदारधार्जिण्या भूमिकेमुळे आतापर्यंत प्रशासनाने सुमारे ४०० कोटी रुपये केवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यावर खर्च केला आहे. माझ्या मते, ही सर्वसामान्य नागरिकांच्या कररुपी पैशाची सरळ उधळपट्टी आहे, असा आक्षेपही आमदार अण्णा बनसोडे यांनी नोंदवला आहे.

तसेच, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वयीत करण्याबाबत पत्रव्यहावर केला होता. मात्र, त्याला सकारात्मक प्रतिसाद देण्यास महापालिका प्रशासन कमी पडले. अद्याप बहुतेक कॅमेरे बंद अवस्थेत आहेत. आता नवीन निविदा काढून विशिष्ठ ठेकेदाराला पोसण्याचे काम प्रशासन करीत असेल, तर ही बाब पिंपरी-चिंचवडकर कदापि सहन करणार नाहीत, असा इशारा आमदार बनसोडे यांनी दिला आहे.

### निविदा पूर्व बैठकीत कंपन्यांच्या हरकती...

**» दि. ३१ मे रोजी सीसीटीव्ही कॅमरे बसवण्याच्या फेज- २ च्या कामासाठी प्रशासनाकडून निविदा पूर्व बैठक घेण्यात आली. त्यामध्ये देशभरातील ४० हून अधिक ठेकेदार आणि पुरवठादार कंपन्यांनी सहभाग नोंदवला. मात्र, सल्लागार कंपनीने तशाप्रमाणे पक्षपातीपणा केला आहे. एक-दोन पुरवठादार कंपन्याच पात्र ठरतील, अशा अटी व शर्ती घातल्या आहेत. तांत्रिक बाबींचा समाविष्ट करताना विशिष्ठ पुरवठादार कंपनीच्या हितासाठी तजवीज केली आहे, असे निदर्शनास आले आहे. काही कंपन्यांनी प्रशासनाला त्याबाबत लेखी हरकती नोंदवल्या आहेत, असेही आमदार अण्णा बनसोडे म्हटले आहे.**

**“ महापालिका प्रशासकीय प्रमुख या नात्याने आयुक्त शेखर सिंह यांनी सीसीटीव्ही कॅमेरा निविदा प्रक्रियेत स्वत: लक्ष घालावे. ज्यामुळे निविदा प्रक्रियेमध्ये कामाचा दर्जा आणि गुणवत्ता अबादित राहील व जास्तीत-जास्त ठेकेदारांना आणि साहित्य पुरवठादार कंपनींना स्पर्धेत सहभागी होता येईल. प्रसंगी सदर सदोष निविदा प्रक्रिया स्थगित करावी आणि सल्लागार व संबंधित अधिकाऱ्यांना पारदर्शीपणे निविदा प्रक्रिया राबवण्याची सूचना करावी, अशी आमची आग्रही मागणी आहे.**

**– अण्णा बनसोडे,** आमदार ( पिंपरी विधानसभा

# पिंपरी-चिंचवड शहरात आजही शेकडो होर्डिंग अनाधिकृत!

## » पालिका प्रशासनाकडून कारवाईचा केवळ दिखाऊपणा – नाना काटे

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चौका चौकातील व रस्त्याच्या बाजूला आजही शेकडो जाहिरात होर्डिंग उभी आहेत. अशी धोकादायक असणारे आणि कोसळलेले जाहिरातीचे होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट केले का? याचीसुध्दा सविस्तर माहिती जनतेसमोर आली पाहिजे.**



आता उभ्या असणाऱ्या होर्डिंगला परवानगी दिली असल्यास अथवा संबंधितांनी परवानगी मागितली असल्यास परवानगीच्या प्रस्तावाप्रमाणेच होर्डिंग उभारले आहे का ? होर्डिंग अनाधिकृत असल्यास त्याबाबत कोणती कारवाई केली. तसेच कोणतीही कारवाई केली गेली नसल्यास त्याबाबत कोण जबाबदार कोण ? अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी तातडीने सखोल चौकशी अहवाल जनतेसमोर मांडावा अशी मागणी माझी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहरात अवकाळी पावसामुळे किवळे येथे होर्डिंग दुर्घटना घडली. यामध्ये ५ व्यक्तींना प्राण गमवावा लागला होता. त्यानंतर ४ दिवसापूर्वी हिंजवडी परिसरात ही होर्डिंग कोसळल्याची दुर्घटना घडली. त्यामुळे शहरात अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न ऐरणी वरती आहे. मात्र, महापालिकेच्या अधिकाऱ्याकडून अनेक भागात कारवाईचा केवळ फार्स केला जातो आहे. आजही शहरात अनेक भागात धोकादायक पद्धतीने होर्डिंग जैसे थे आहेत. यावरती महापालिका कधी कारवाई करणार की नागरिकांच्या जीवाशी खेळणार असा प्रश्न काटे यांनी उपस्थित केला आहे.

शहरातील चौकाचौकात अनेक होर्डिंगचा सुळसुळाट झाला आहे. होर्डींग वरती कारवाई करताना महापालिकेच्या अधिकाऱ्याकडून होर्डिंग चालकाला मदत केली जात आहे.

कारण होर्डिंगवरती अवकाळी पावसामुळे कारवाई होऊ नये यासाठी अनेक होर्डिंग चालकांनी आपले होर्डिंग वरील फ्लेक्स उतरवून ठेवले आहेत. शहरातील अनेक चौकामध्ये रस्त्यापासून अवघ्या पाच ते दहा फुटाच्या अंतरावरतीच होर्डिंगचे जाळे उभारले असल्याचे दिसून येते. अनेक होर्डिंग चालकांनी किवळे येथील घटनेनंतर पालिकेतील संबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क साधून कारवाई न होण्यासाठी भेटीगाठी केल्या असे निदर्शनास येत आहे. मात्र होर्डिंग दुर्घटनेत जीव जाणाऱ्या सामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या महापालिका अधिकारी यांच्यावरती कारवाईचा बडगा उभारणे गरजेचे आहे. अन्यथा रस्त्यावरून येणारा जाणारा माझा सामान्य नागरिक यांच्या मनात कायम भीतीचे वातावरण राहणार आहे असे नाना काटे यांनी म्हटले आहे.

# 'सुर्या' मध्ये दिसणार प्रेमाचा त्रिकोण..!

अॅक्शनपट प्रेक्षकांना नेहमीच भुरळ घालत आले आहेत. धडाकेबाज अॅक्शन सीन नायक नायिकेमधील रोमान्स आणि त्याला खटकेबाज संवादाची फोडणी अशा त्रिसूत्रीवर आधारलेला रोमँटिक आणि अॅक्शनचे परफेक्ट कॉम्बिनेशन असलेला 'सुर्या' हा चित्रपट 6 जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. राजेंद्र ठाकरे आणि आकाश गोयल प्रस्तुत आणि एस.पी मोशन पिक्चर्स, डीके निर्मित 'सुर्या' या अॅक्शनपॅक्ड चित्रपटाचे दिग्दर्शन हसनैन हैद्राबादवाला यांचे आहे. असत्याविरुद्ध सत्याचा लढा, त्याला नायक-नायिकेच्या प्रेमाची फोडणी 'मनोरंजनाचं पॅकेज' असलेल्या 'सुर्या' या चित्रपटातून प्रेमाचा त्रिकोण ही प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. प्रसाद मंगेश, रुचिता जाधव, देवशी खंडुरी हे युवा चेहरे या चित्रपटात दिसणार आहेत. सळसळत्या रक्ताचा आणि तळपत्या ज्वालांचा अंगार.. 'सुर्या'... अशा जबरदस्त टॅग लाईनसह प्रसाद मंगेश हा नवोदित अभिनेता या चित्रपटात नायकाच्या रूपात आपला धमाका दाखविण्यास सज्ज झाला आहे. अॅक्शनने ठासून भरलेला' 'सुर्या' चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे.



# 'जग्गू आणि जुलिएट: प्रेमाची भेट

'जग्गू आणि जुलिएट' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अमेयने सोशल मीडियाच्या माध्यमातून या सिनेमाची घोषणा केली आहे. 'जग्गू आणि जुलिएट' हा सिनेमा येत्या 10 फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचं पहिलं पोस्टर रिलीज झाल्यापासून चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत होते. अखेर आता चाहत्यांची प्रतीक्षा संपली आहे. अमेय वाघ आणि वैदेही परशुरामी ही भन्नाट जोडी या सिनेमात मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

अमेय वाघने या सिनेमाची झलक चाहत्यांसोबत शेअर केली आहे. या व्हिडीओमध्ये अमेय आणि वैदेही जावा बाईकवर बसलेत, वैदेही बेधडकपणे गाडी चालवत आहे आणि अमेय मागे गाडीवर उभा आहे. अंगात रंगीबेरंगी जॅकेट, गळ्यात सोन्याची साखळी आहे ज्यावर 'RICH' असं लिहिलंय. तर वैदेही तिच्या लेदर जॅकेट, गॉगल आणि बिनधास्त स्माईलने सगळ्यांना घायाळ करत आहे". व्हिडीओ शेअर करत अमेयने लिहिलं आहे,"फेब्रुवारीत मिळणार प्रेमाची भेट, जग्गू आणि जुलिएट. तवाफ्राय प्रेमाची रवाफ्राय लव्हस्टोरी". आता या सिनेमात अमेय नक्की काय धमाल करणार हे पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. अमेय वाघचा नेहमीपेक्षा वेगळा असा अतरंगी लूक बघून सिनेमात आणखी कोणकोणते कलाकार असतील हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.महेश लिमये 'जग्गू आणि जुलिएट' या सिनेमाचं दिग्दर्शन करणार आहे. तवाफ्राय प्रेमाची रवाफ्राय लव्हस्टोरी पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. अजय-अतुल म्युझिकल आणि महेश लिमये यांच्या दिग्दर्शनाची आणि कॅमेऱ्याची जादू दाखवणारा 'जग्गू आणि जुलिएट' 10 फेब्रुवारी रोजी आपल्या भेटीस येत आहे.




# अक्षय आणि इमरान दिसणार एकत्र!

'सेल्फी' चित्रपट येणार प्रेक्षकांच्या अक्षय कुमार आणि इमरान हाशमी प्रेक्षकांना एकत्र पाहायला मिळणार आहे. दोघांचा विनोदी चित्रपट 'सेल्फी' हा लवकरचा प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या घोषणेनंतर त्यांच्या चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. तर सेल्फी हा पुढील वर्षी २४ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपट निर्मात्यांनी अधिकृत प्रसिद्धीपत्रक काढले असून त्यात म्हटले आहे, की धर्मा प्रोडक्शन्स, पृथ्वीराज प्रोडक्शन्स, मॅजिक फ्रेम्स आणि केप ऑफ गुड फिल्म्सने अगोदरच 'सेल्फी'ची घोषणा केली. यात अक्षय कुमार आणि इमरान हाशमी याबरोबरच दियाना पेंटी आणि नुसरत भरुचा यांची भूमिका असलेला चित्रपट २४ फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन राज मेहता यांनी केले आहे.



# मधुरा देशपांडेचं मालिका विश्वात दमदार पुनरागमन

स्टार प्रवाहवरील सर्वच मालिकांना रसिक प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळत आहे. नव्या वर्षात नव्या मालिकेची भेट प्रेक्षकांना देण्यासाठी स्टार प्रवाह वाहिनी सज्ज आहे. प्रेक्षकांची दुपार आणखी खास करण्यासाठी 16 जानेवारी पासून स्टार प्रवाह परिवारात दाखल होतेय नवी मालिका 'शुभविवाह' (SHUBHVIVAH). सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुरा देशपांडे (MADHURA DESHPANDE) या मालिकेत झळकणार असून तीन वर्षांनंतर ती शुभविवाहच्या निमित्ताने मालिका विश्वात पुनरागमन करणार आहे. बहिणीच्या स्वप्नासाठी आपलं आयुष्य पणाला लावणाऱ्या भूमीच्या त्यागाची गोष्ट म्हणजे शुभविवाह ही मालिका.

भूमी या व्यक्तिरेखेविषयी सांगताना मधुरा म्हणाली, 'तीन वर्षांच्या गॅपनंतर मी मालिकेत काम करत आहे. स्टार प्रवाह वाहिनीसोबत पुन्हा एकदा काम करताना अतिशय आनंद होत आहे. भूमी हे पात्र साकारणं माझ्यासाठी नवं आव्हान आहे. कारण भूमीसारखी इतका पराकोटीचा त्याग करणारी व्यक्तिरेखा मी पहिल्यांदाच साकारते आहे.



# टीम इंडिया दिसणार आता नव्या रूपात!

## तिन्ही फॉरमॅटसाठी वेगवेगळ्या नवीन जर्सी लॉन्च

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय क्रिकेट संघ आता न्यू जर्सीमध्ये मैदानावर दिसणार आहे. नवीन प्रायोजक ADIDAS ने तिन्ही फॉरमॅटसाठी जर्सी लाँच केल्या आहेत. एकदिवसीय, टी-२० आणि कसोटीसाठी वेगवेगळ्या डिझाईन आहेत.**




भारतीय संघ आता नव्या रूपात गिसणार आहे. टीम इंडीयाच्या नवीन किट प्रायोजक असलेल्या जगप्रख्यात कंपनीने नवीन जर्सी लाँच केली आहे. ADIDAS ने ICC टेस्ट चॅम्पियनशिपच्या आधी वेगळ्याच रूपात नव्या जर्सी सर्वांसमोर आणल्या आहेत. भारतीय क्रिकेट संघाच्या नवीन जर्सीचे अनावरण गुरुवारी आदिदासने केले. आता या जर्सीत भारतीय खेळाडू मैदानात दिसणार आहेत. ही जर्सी भारतीय क्रिकेट संघाच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये (ODI, T20 आणि टेस्ट) लाँच करण्यात आली आहे. ७ जूनपासून भारतीय संघ डब्ल्यूटीसीचा अंतिम सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. सध्या खेळाडू सराव नवीन जर्सीमध्येच करत आहेत. गेल्या महिन्यातच बीसीसीआयने एडिडासशी २०२८ पर्यंतचा करार केला आहे. कंपनीने आपल्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर न्यू जर्सी येथील व्हिडिओ शेअर केला आहे. टीम इंडियाही नव्या ट्रेनिंग किटमध्ये सराव करत आहे. कसोटी चॅम्पियनशिप फायनलसाठी खेळाडू इंग्लंडमध्ये आल्यानंतर नवीन प्रशिक्षण किट लाँच करण्यात आली. इंग्लंडमधील वातावरण पाहून हे नवीन किट डिझाईन करण्यात आले असून या किटच्या हातांवर त्या काळ्या पट्ट्या देण्यात आल्या आहेत, जी पुन्हा एकदा आदिदास कंपनीच्या लोगोशी मेळ घालणारे आहे.

### तिन्ही फॉरमॅटसाठी वेगवेगळी जर्सी

आदिदासने टीम इंडियाच्या तिन्ही फॉरमॅटसाठी वेगवेगळी जर्सी तयार केली आहे. टी-२०, वनडे आणि कसोटी सामन्यांसाठी वेगवेगळ्या डिझाईन केल्या आहेत. या जर्सीवरूनही आता संघ कोणत्या फॉरमॅटमध्ये खेळत आहे हे ओळखता येईल.

BCCI ने २०२८ पर्यंत जगातील सर्वात मोठ्या स्पोर्ट्सवेअर ब्रँड ADIDAS सोबत करार केला आहे. ADIDAS टीम इंडियाच्या जर्सीचे डिझाईन करणार आहे. भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये आदिदासने डिझाईन केलेली नवीन जर्सी घालणार असल्याची अधिकृत माहिती बीसीसीआयने आधीच दिली होती. इतिहासात पहिल्यांदाच जर्सीला ३ पट्टे आहेत, ही देखील ADIDAS कंपनीची ओळख आहे.

### वानखेडे स्टेडियममध्ये कार्यक्रम

आदिदासच्या नव्या जर्सी लाँचचा कार्यक्रम मुंबईतील प्रसिद्ध वानखेडे स्टेडियमयवर करण्यात आला. टीम इंडियाच्या नव्या कोऱ्या महाकाय जर्सी हवेत फडकावत सर्वांनाच दाखवण्यात आल्या. टीम इंडियाच्या या जर्सीवर आदिदासची ओळख असलेले तीन पट्टेदेखील असणार आहेत. आदिदासच्या लोगोव्यतिरिक्त डिझाईन म्हणून सुद्धा या ३ पट्ट्या दिसत आहेत.

# प्रो लीग हॉकी: भारताचा बेल्जियमला धक्का!

## कर्णधार हरमनप्रीत सिंगने बेल्जियमला 5-1 असे केले पराभूत

। लंडन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कर्णधार हरमनप्रीत सिंगने नोंदवलेल्या दोन गोलच्या जोरावर भारताने प्रो लीग हॉकीमध्ये शुक्रवारी ऑलिम्पिक विजेत्या बेल्जियमला ५-१ असे पराभूत केले. प्रो लीगच्या युरोप दौऱ्यात सलग दोन सामने गमावल्यानंतर भारताला विजयी पुनरागमन करण्यात यश आले. भारताचा आज, शनिवारी ग्रेट ब्रिटनशी सामना होईल.**




बेल्जियमविरुद्ध मध्यरक्षक विवेक सागर प्रसादने भारताला दुसऱ्याच मिनिटाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर २० आणि ३०व्या मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरवर गोल नोंदवून भारताची आघाडी वाढवली. भारताकडून अमित रोहिदास (२९व्या मि.) व दिलप्रीत सिंग (६०व्या मि.) यांनी अन्य दोन गोल केले. बेल्जियमचा एकमेव गोल विल्यम घिसलेनने ४६व्या मिनिटाला केला. प्रो लीगच्या युरोप दौऱ्याला सुरुवात करताना भारतीय संघ गुणतालिकेत आघाडीवर होता. मात्र, युरोप दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात भारताला बेल्जियम आणि ग्रेट ब्रिटनकडून पराभव पत्करावे लागले.

दुसऱ्या टप्प्याला मात्र भारताने अप्रतिम सुरुवात केली. बेल्जियमविरुद्ध सुरुवातीलाच गोल केल्यावर संपूर्ण सामन्यात भारताने नियोजनबद्ध खेळ केला.

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: पेगुला, रुब्लेव्ह पराभूत

। पॅरिस ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



महिलांमध्ये तिसऱ्या मानांकित अमेरिकेच्या जेसिका पेगुला आणि पुरुषांमध्ये सातव्या मानांकित आंद्रे रुब्लेव्ह यांना फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील तिसऱ्या फेरीत पराभवाचा धक्का बसला. त्यामुळे त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. महिलांमध्ये दुसऱ्या मानांकित अरिना सबालेन्का आणि सहाव्या मानांकित कोको गॉफने, तर पुरुषांमध्ये नवव्या मानांकित टेलर फ्रिट्झ आणि २२व्या मानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांनी मात्र विजयी घोडदौड कायम राखली.

महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पेगुला २८व्या मानांकित बेल्जियमच्या एलिस मर्टेन्सकडून पराभूत झाली. मर्टेन्सने ही लढत ६-१, ६-३ अशी सहज जिंकली. पेगुलाने गेल्या पाचपैकी चार ग्रँडस्लॅम स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरीचा टप्पा गाठला आहे. मात्र, फ्रेंच स्पर्धेत तिला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. पेगुलाची अमेरिकन सहकारी गॉफला मात्र विजय मिळवण्यात यश आले. गॉफने ऑस्ट्रियाच्या जुलिया ग्राबहेरचा ६-२, ६-३ असा पराभव केला.